# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २२६२ ०६०१, २२६९ ०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स २२६९२१०२/०००७.

तार - EDUTECH E-mail : desk4a@dte.org.in Internet :htpp/www.dte.org

कार्यालयीन आदेश

क्रमांक : ४अ/आस्था/२००९/२१४५७

दिनांक : ३१.०८.२००९

पहा : १. शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक कंत्राटी २००७/(७७/०७)/ तांशि-२, दिनांक ०५.०५.२००७.

उपरोक्त शासन निर्णयान्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे राज्यातील शासकीय तंत्रनिकेतने व तत्सम संस्थांतील रिक्त असलेल्या अधिव्याख्यात्यांच्या पदावर खाली नमुद केलेल्या उमेदवाराची रु.१२०००/- (रुपये बारा हजार फक्त) या मासिक ठोक वेतनावर त्यांच्या नावासमोरील दर्शविलेल्या पदावर या आदेशाच्या दिनांकापासून दोन वर्ष किंवा महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत अथवा नियमित स्वरुपात नियुक्तीने उमेदवार उपलब्ध होणे यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत निव्वळ कंत्राटी तत्वावर नियुक्ती करीत आहेत.

| अक्र | उमेदवारांचे नाव व पत्ता | नियुक्ती प्रवर्ग | कंत्राटी तत्वावर नियुक्तीचे पद व ठिकाण |
|---|---|---|---|
| १. | श्री नवशिंदे संपदा प्रभाकरराव (८८००९३१२) द्वारा इनामदार जे आर, १०४ अत्रे कोनार्कविहार, फरांदे नगर नांदेड ४३१६०२ | खुला | शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, **तासगांव** येथे नवनिर्मित रिक्त असलेल्या **अधिव्याख्याता गणित** या पदावर |
| २. | श्रीमती अपर्णा ज्ञानेश्वर हजारे (८८००९५७३) ९९ तेजश्री, विरशव नगर, विजापूर रोड, भारती विद्यापीठ जवळ, सोलापूर ४१३००४ | खुला | शासकीय तंत्रनिकेतन, **अवसरी (पुणे)** येथे रिक्त असलेल्या **अधिव्याख्याता गणित** या पदावर |
| ३. | श्री कदम विनायक शिवाजीराव (८८०१२३९६) जी डी एस एस के लिमीटेड देवनंद्र, ता पथरी, जि परभणी ४३१५०६ | खुला | शासकीय तंत्रनिकेतन, **वाशिम** येथे रिक्त असलेल्या **अधिव्याख्याता गणित** या पदावर |
| ४. | श्रीमती तारा रुमजी धकाते (८८०१०१२४) ८३/२ सोमवार पेठ, एस बी सिटी कॉलेज, नागपूर ४४०००९ | खुला | शासकीय तंत्रनिकेतन, **गोंदिया** येथे रिक्त असलेल्या **अधिव्याख्याता गणित** या पदावर |
| ५. | श्री वाघ वसंत धाकू (८८०११९२९) चौधरी लेन, हाडवैद्य, शिरपूर, जि धुळे ४२५४०५ | इमाव | शासकीय तंत्रनिकेतन, **नंदुरबार** येथे रिक्त असलेल्या **अधिव्याख्याता गणित** या पदावर |

वरील उमेदवारांच्या कंत्राटी तत्वावरील नियुक्त्या पुढील अटी व शर्तींच्या अधिन राहून करण्यात येत आहेत.

१. **त्यांची नियुक्ती या आदेशाच्या दिनांकापासून दोन वर्ष किंवा महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत अथवा नियमित स्वरुपात नियुक्तीने उमेदवार उपलब्ध होणे यापैकी जे अगोदर घडेल तेवढया कालावधीसाठी असतील, त्यानंतर या कंत्राटी नियुक्त्या आपोआप संपुष्टात येतील.**
२. त्यांची नियुक्ती रुपये १२०००/-(रुपये बारा हजार फक्त) या एकत्रित मासिक वेतनावर करण्यात येत असून त्यांना कोणत्याही प्रकारचे इतर भत्ते अनुज्ञेय राहणार नाहीत.
३. त्यांनी संबंधित शासकीय तंत्रनिकेतनात उपलब्ध असलेल्या करार पत्राच्या नमुन्यात रुपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवर करारपत्र नियुक्त पदावर हजर होतेवेळी देणे बंधनकारक आहे, अन्यथा सदरचे आदेश रद्द ठरतील.

४. त्यांची सेवा बदलीपात्र राहणार नाहीत, मात्र प्रशासकीय कारणास्तव व विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कार्यासाठी गरज उद्‌भवल्यास त्यांची इतर शासकीय तंत्रनिकेतनात बदली करण्यात येईल.

५. त्यांची नियुक्ती त्यांचे शैक्षणिक / अद्यापनाचे काम समाधानकारण असल्यावर अवलंबून राहील व कोणत्याही पुर्वसुचनेशिवाय संपुष्टात आणण्यात येतील व याबाबतीत संबंधित विभाग प्रमुख व प्राचार्य यांची शिफारस अंतिम राहील.

६. त्यांचे विरुध्द विद्यार्थ्यांची तक्रार असल्यास सदर तक्रारीबाबत संबंधित विभाग प्रमुख / प्राचार्यांच्या शिफारशीनुसार त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

७. **त्यांनी या आदेशाच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत रुजू व्हावे, जे उमेदवार दिलेल्या मुदतीत रुजू होणार नाहीत त्यांच्या नियुक्तीचा आदेश आपोआप संपुष्टात येईल त्याबाबत पुर्नविचार करण्यांत येणार नाही याची नोंद घ्यावी.**

८. त्यांची नियुक्ती करारपत्रात नमुद केलेल्या कालावधीनंतर आपोआप संपुष्टात येईल.

९. प्रस्तुत नियुक्ती ही निव्वळ कंत्राटी पध्दतीने असल्यामुळे संबंधितांना नियमित नियुक्ती धारकांचे लाभ मिळणार नाहीत.

१०. त्यांना अद्यापनाशिवाय वरीष्ठांनी सोपविलेली तद्‌अनुषंगीक इतर प्रशासकीय कामे कारणे बंधनकारक राहील.

११. संबंधितांची नियुक्ती जर विशिष्ट मागासवर्गीय प्रवर्गाचा उमेदवार उपलब्ध न झाल्यामुळे त्या पदावर केलेली असेलतर त्यांची सेवा भविष्यात सदर विशिष्ट मागासवर्गीय प्रवर्गाचा उमेदवार उपलब्ध झाल्यास समाप्त करण्यात येईल.

१२. **त्यांनी त्यांच्या शैक्षणिक अर्हतेसंबंधी, जात व जात वैधता प्रमाणपत्र ( लागू असल्यास ) व उन्नत / उच्च उत्पन्न गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र (नॉनक्रिमीलेअर सर्टिफिकेट) (लागू असल्यास) या प्रमाणपत्राचा छायांकित १ संच मुळ प्रमाणपत्रासह नियुक्तीच्या पदावर हजर होतेवेळी प्राचार्यांना सादर करावा. त्यांनी ऑन लाईन पध्दतीने अर्ज करताना दिलेली माहिती व प्रत्यक्ष प्रमाणपत्रांची माहिती यामध्ये तफावत आढळल्यास संबंधितांचे नियुक्ती आदेश आपोआप संपुष्टात येतील, याची नोंद घेण्यात यावी.**

१३. संबंधितांवर कोणत्याही प्रकारचा गुन्हा नसल्याचे किंवा कोणत्याही प्रकारचे आरोप नसल्याचे प्रतिज्ञापत्र स्वतंत्रपणे संबंधितांनी सादर करणे अनिवार्य आहे.

१४. ज्या प्रकरणी वरील कार्यपध्दतीचे पालन करण्यात येणार नाही, त्याप्रकरणी संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन कारवाई करण्यांत येईल.

( डॉ सु का महाजन )
प्र संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : मा प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२ यांना माहितीसाठी सादर.

प्रत : माहिती व आवश्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित

१. कोषागार अधिकारी , तासगांव, अवसरी (पुणे), वाशिम , गोंदिया, नंदुरबार. (मानार्थ) (प्राचार्यांमार्फत)
२. सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, पुणे / नाशिक / अमरावती / नागपूर
३. प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, अवसरी (पुणे), वाशिम , गोंदिया, नंदुरबार
४. प्राचार्य, शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, तासगांव
५. संबंधित व्यक्ती
६. श्री एन बी पाटील, प्रणाली विश्लेषक, मुख्य कार्यालय, मुंबई
७. कार्यासन क्रमांक ४अ, निवड नस्ती.